॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**Fax : (02462) 215572**
**Phone: (02462) 215246**

**Department of Student's Development**

**website:** srtmun.ac.in
**Email:** dsd@srtmun.ac.in

जा.क्र./ वि.वि.वि./ २०२६-२७/१०९ दिनांकः- ०३/१०/२०२६

## अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे

**प्रति,**

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, लातूर, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी, प्रस्तुत विद्यापीठ
मा. प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
मा. समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट

**विषय:** आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव **'ज्ञानतीर्थ – २०२६'** साठी online link द्वारे प्रवेशिका सादर करणे बाबत ..

**संदर्भ :** या विभागाचे पत्र क्र. वि.वि.वि./ २०२६-२७/९८ दि. २५ /०९/२०२६

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव **दि १६ ते १९ ऑक्टोबर, २०२६ दरम्यान** नांदेड एजुकेशन सोसायटीचे **सायन्स कॉलेज, नांदेड** येथे आयोजित करण्यात आला आहे. सदरील युवक महोत्सवासाठी महाविद्यालयांच्या प्रवेशिकेसाठी online लिंक उपलब्ध करून देण्याबाबत आपणास कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने युवक महोत्सवात सहभाग घेणाऱ्या महाविद्यालयांनी आपल्या प्रवेशिका खालील लिंक च्या माध्यमातून दिनांक **१० ऑक्टोबर, २०२६** पर्यंत online पद्धतीने सादर करून आपल्या प्रवेशिकेची छायांकित प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह विद्यार्थी विकास विभागात प्रत्यक्ष पोहोच करावी, तदनंतरच युवक महोत्सवात संबंधित महाविद्यालायचा प्रवेश ग्राह्य धरल्या जाईल, याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी सोबत मार्गदर्शक सूचना जोडल्या आहेत.

Online लिंक: https://youthfestival2026.com/

**स्वा/-**
**डॉ. राजपालसिंह चिखलीकर**
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग

**प्रत माहितीस्तव:**
सिस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर "https://srtmun.ac.in/youth-festival/" सदराअंतर्गत प्रसिद्ध करावे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव **'ज्ञानतीर्थ – २०२६'** साठी online link
द्वारे प्रवेशिका सादर करणे बाबत

## मार्गदर्शक सूचना

1. युवक महोत्सवासाठी मध्ये online प्रवेशिका सादर करून सहभाग नोंदविणे साठी महाविद्यालयाने https://youthfestival2026.com/ ही लिंक open करावी.
   (सदरील लिंक **विद्यापीठ संकेतस्थळावर** Home →DSD → youth-festival या मथळ्याखाली उपलब्ध आहे. )

2. Username हा आपल्या महाविद्यालयाचा तीन अंकी विद्यापीठ संलग्नीकरण कोड आहे. Default Password : **123456** असा आहे .
3. वरीलप्रमाणे Username व पासवर्ड चा वापर करून Login करावे.
   तदनंतर विद्यापीठाने दिलेला Default Password : **123456** बदल करून घ्यावा व **नवीन पासवर्ड जतन करून ठेवावा.**

4. **नवीन Username व पासवर्ड चा वापर** करून पुनश्च Login करावे.
5. Login केल्यानंतर डाव्या बाजूस असलेल्या Dashboard खाली
   - **Team Managers** अंतर्गत संघ व्यवस्थापक यांची माहिती भरावी.
   - **Student Registration** अंतर्गत सहभागी विद्यार्थ्यांची माहिती भरावी.
   - **Accompanists** अंतर्गत वादक / साथीदार / मदतनीस यांची माहिती भरावी.
   - **Events Participated by College** अंतर्गत आपल्या महाविद्यालयाने एकूण 30 कलाप्रकरांपैकी किती कलाप्रकारामध्ये सहभाग नोंदविला आहे? व त्यामध्ये कोणते विद्यार्थी आहेत ? यांची माहिती भरावी.
     (टीप : एखाद्या कलाप्रकरामध्ये सहभाग नोंदविला नसल्यास त्याची माहिती निरंक ठेवावी.)

   Events Participated by College मध्ये माहिती भरल्यानंतर महाविद्यालयाने सहभाग घेतलेल्या कलाप्रकरच्या अनुषंगाने **भरावयाचे एकूण शुल्क चा हिशोब** स्वयंसंचालित दिसेल.
6. **Online Payment :** उपरोक्त प्रमाणे दर्शविलेले शुल्क online पद्धतीने या लिंक वर click करून भरावे.

7. **आवश्यक शुल्क भरल्यानंतर**

- **Final Submission** अंतर्गत पेजच्या शेवटी असलेले Confirm & Submit Selected Entries या बटन चा वापर करून आपल्या महाविद्यालयाची ऑनलाइन प्रवेशिका सादर करावी. **Final Submission** केल्यानंतर आपणास आपल्या प्रवेशिकेमध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

8. **Reports** अंतर्गत तयार झालेले reports प्रिंट करून घ्यावेत तसेच **कॉलेज हमीपत्र** डाउनलोड करून घ्यावे. व ते reports प्राचार्य यांचा सही व शिक्क्यासह तसेच आवश्यक त्या documents सह (विद्यार्थ्यांचे कॉलेज ओळखपत्र ची प्रत ,बोनफाईड, 10 वी उत्तीर्ण प्रमाणपत्र (जन्म तारखेचा पुरावा करिता ), 12 वी उत्तीर्ण गुणपत्रक प्रत तसेच मागील उत्तीर्ण (Summer-2026) परीक्षेचे गुणपत्रक ची प्रत, आधार कार्ड ची प्रत इत्यादि) विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागात जमा करावे. तदनंतरच युवक महोत्सवात संबंधित महाविद्यालयचा प्रवेश ग्राह्य धरल्या जाईल, याची नोंद घ्यावी.
9. विद्यापीठात प्रवेशिका प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाने सदरील प्रवेशिका Approve केल्यानंतर College Login मध्ये युवक महोत्सवासाठीचे ओळखपत्र / पास स्वयंसंचालित Generate होईल.

Step 1 https://youthfestival2026.com/ ही लिंक open करावी.

Step 2




Step 3 to 7

